# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)


क्र:मजनिप्रा/२०२५ / जलदर (२०२२-२५)/ मुदतवाढ /६३० दिनांक: ३१/१२/२०२५

विषय :- ठोक पाणी प्रशुक्ल दराबाबत दि . २९/०३/२०२२ च्या आदेशास दि. ०१/०१/२०२६ ते ३०/०६/२०२६ या कालावधीसाठी सहा महिन्याची मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ : (१) मजनिप्रा आदेश दि. २९/०३/२०२२

(२) जलसंपदा विभागाचे पत्र क्र. संकीर्ण -२०२४/प्र. क्र. १६१/२४/सिंव्य (धोरण) दि. ३०/१२/२०२५

(३) मजनिप्राचे मुदतवाढ आदेश क्र. मजनिप्रा/२०२५ / जलदर (२०२२-२५)/ मुदतवाढ /३१९ dated. २४/०६/२०२५

पार्श्वभूमी :

**ज्याअर्थी**, प्राधिकरणाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ (घ) व ११ (प) अंतर्गत विविध वापर प्रवर्गांकरिता ठोक जलप्रशुल्क निश्चित करण्याबाबत दिनांक. २९/०३/२०२२ रोजी आदेश निर्गमित केला असून, त्यानंतर योग्य कार्यपद्धतीचे पालन करून **आदेश क्र. १/२०२४ दिनांक. ०२/०२/२०२४** व **आदेश क्र. २/२०२४ दिनांक. ३०/०८/२०२४** द्वारे त्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या, व सदर आदेश ०१/०७/२०२२ ते ३०/०६/२०२५ या नियंत्रण कालावधीसाठी निर्धारित करण्यात आला; आणि

**ज्याअर्थी,** या आदेशानुसार निश्चित केलेले सदर दर दिनांक. **३०/०६/२०२५** पर्यंत लागू होते; आणि

**ज्याअर्थी,** प्राधिकरणाने **संदर्भ क्रमांक ३** मधील आदेशाची वैधता **दि. ०१ जुलै २०२५ पासून दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत** वाढविली आहे; आणि

**ज्याअर्थी,** प्राधिकरण **जुलै २०२५ ते जून २०२८** या नियंत्रण कालावधीसाठी ठोक जलप्रशुल्क निश्चित करण्याच्या प्रक्रियेत असून, खालील टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत;

१. माहे २०१३ चे जलदर प्रशुल्क विनियम प्राधिकरणाने माहे **मे २०१९** मध्ये रद्द केले आहे;
२. जल प्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे या बाबतच्या मार्गदर्शक सूचना **१४ नोव्हेंबर, २०१९** ला अधिसूचित करण्यात आली;
३. माहे **एप्रिल २०२४,** मध्ये मसुदा दृष्टीनिबंध निश्चितीकरण करुन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला;
४. जलसंपदा विभागाकडून आवश्यक माहिती सहित दर प्रस्ताव सादर करण्याची विनंती करण्यात आली असून, त्यासाठी **११ नमुने** पुरविण्यात आले व सदर प्रस्ताव **संदर्भ पत्र क्रमांक. २ दिनांक ३०/१२/२०२५** अन्वये प्राप्त झाला;
५. उपलब्ध माहितीनुसार सन २०२५-२०२८ या नियंत्रण कालावधीसाठी ठोक जलप्रशुल्क निकषांचे काम सुरु केले आहे; आणि **पाहिल्या टप्प्यातील तज्ञ** समुहासमवेतची भागधारक **सल्लामसलत** प्रक्रिया पूर्ण केली आहे.
६. तज्ञ समुहाचे अभिप्राय विचारात घेऊन सन २०२५-२८ करिता ठोक जलदर निर्धारणाचे निकषाचा मसुदा सुधारित करून तो राज्य शासनास पाठविण्यात आला आहे; आणि,

**ज्याअर्थी,** जलसंपदा विभागाने दर प्रस्ताव सादर केला असून, तसेच दिनांक **२९/०३/२०२२** च्या दर आदेशास ०१ **जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६** या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची विनंती दिनांक ३०/१२/२०२५ च्या पत्राद्वारे प्राधिकरणाकडे केली आहे; आणि

**ज्याअर्थी,** जलसंपदा विभागाची विनंती व वरील सर्व बाबींचा विचार करता, दर निश्चितीचे कार्य विलंबित होण्याची शक्यता असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आले असून, ठोक पाणी वापरकर्त्यांकडून दर आकारणी व वसुली करता यावी यासाठी, **महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ (घ)** तसेच **महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जल प्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) मार्गदर्शक सूचना २०१९, मधील परिच्छेद ९** अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, **प्राधिकरणाने आपल्या ठराव क्रमांक.३४८ दि. ३०/१२/२०२५** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## आदेश

**शासनाच्या विनंतीनुसार आता असे आदेश** देण्यात येत आहेत की, **दि. २९/०३/२०२२** च्या ठोक जलप्रशुल्क आदेशास, **दिनांक ०१/०१/२०२६ पासून दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत असून या वाढीव कालावधीसाठी सन **२०२४-२५ या वर्षाचे प्रचलित दर लागू** राहतील.

स्वाक्षांकित/-

(डॉ. प्रभात जैन)
मा. सदस्य (भू.)

स्वाक्षांकित/-

(श्री. राजेंद्र मोहिते)
मा. सदस्य (जसंअभि.)

स्वाक्षांकित/-

(सीए. श्वेताली अ. ठाकरे )
मा. अध्यक्षा / मा. सदस्य (अर्थ.)

प्राधिकरणाच्या आदेशानुसार:

(श्री. मल्लिकार्जुन धरणे)
सचिव,मजनिप्रा

टीप : कृपया संदर्भासाठी मूळ इंग्रजी प्रत पाहावी.